# अप्रिय (?) सत्य

**डॉ. मनोज भाटवडेकर**

## नम्रताच्या आई – वडिलांपुढे यक्षप्रश्न होता, 'आम्ही तिचे दत्तक पालक आहोत हे तिला कसं सांगायचं?'

''तू आमची पोटची मुलगी नाहीस आणि दत्तक मुलगी आहेस हे आम्ही नम्रताला कसं सांगायचं? मुळात आधी सांगायचं का? इथपासून आमच्या मनात शंका आहेत. ती आता दोन वर्षांची आहे. ती आमच्या घरी आली तेव्हा सहा महिन्यांची होती. तिच्या दृष्टीने आम्हीच तिचे आई-वडील आहोत. आम्ही असं अनेकांकडून ऐकलंय की, ही गोष्ट कधी ना कधी सांगावीच लागते. या विचाराने आम्ही कासावीस झालो आहोत. नम्रताच्या आमच्या घरी येण्याने गेली दीड वर्ष इतका आनंद निर्माण झालाय म्हणून सांगू ! तो आनंद या एका विचाराने मावळेल की काय अशी भीती वाटायला लागलीय.'' नम्रताच्या आईच्या बोलण्यातून, चेहऱ्यावरून काळजी स्पष्टपणे जाणवत होती. नम्रताचे वडील म्हणाले, ''आमच्याकडे बाकी कुठलीही समस्या नाही. नम्रता आमच्या घरात छान रुळलीय. आमचा प्रश्नच नाही. पण आमच्या नातेवाईक-शेजारीपाजारी, मित्रमंडळींनीही तिला छान स्वीकारलय. या सगळ्या पार्श्वभूमीवर तिला तू आमची दत्तक मुलगी आहेस असं सांगणं आम्हाला जड वाटतंय. समजा हे सांगितलंच नाही तर काय होईल? तिच्या दृष्टीने तसं म्हटलं तर काय फरक पडणार आहे? उगीच हे अप्रिय सत्य तिला सांगून तिच्या मनातला गोंधळ कशाला वाढवायचा असं म्हणतो मी.''

कुठल्याही दत्तक पालकांच्या मनात ही भीती घर करून असते. मुलाला 'तू दत्तक आहेस' हे सांगणं याचा त्यांच्या मनातला अर्थ असतो- ''तुझे खरे आई-वडील आम्ही नाही. दुसरेच कुणीतरी आहेत. आम्ही तुला फक्त आणलं आणि प्रेमाने वाढवलं.'' 'खरे आई-वडील' या शब्दाने सगळा अनर्थ केला आहे. नम्रताच्या आई-वडिलांच्या मनातल्या संघर्षाचं योग्य निराकरण होणं जरूरीचं होतं.

'तुम्ही म्हणाला त्याप्रमाणे तुम्ही नम्रतापासून वस्तुस्थिती लपवून ठेवलीत, तर काय होऊ शकेल याचा आपण विचार करू. सध्या तिच्या दृष्टीने तुम्हीच तिचे आई-वडील आहात असं तुम्ही म्हणालात. सध्याच का? तिच्या दृष्टीने तुम्हीच जन्मभर तिचे आई-वडील राहणार आहात. कारण तुम्ही तिला जे प्रेम देताय ते दुसरं कुणीही तिला देणार नाही. ती जेव्हा वयात येईल, जगाबद्दल विचार करू लागेल त्यावेळी मूल कसं जन्मतं, कुठून येतं या गोष्टींबद्दल तिला माहिती मिळेल. तशात तिच्या जन्माबद्दल जर तिला दुसऱ्या कुणाकडून कळलं-तेही वाईट. चुकीच्या पद्धतीने सांगितलं गेलं-आणि अशा गोष्टी काही हितशत्रू मंडळी करण्याची शक्यता नाकारता येत नाही-तर तिच्या मनावर किती वाईट परिणाम होईल त्याचा विचार करा. अशा केसेस आम्ही पाहिलेल्या आहेत. अशा वेळी दत्तक पालकांबद्दल प्रचंड अविश्वास वाटू शकतो. जन्मदात्या आई-वडिलांचा शोध घ्यावा असं वाटू शकतं. आपल्यापासून एक महत्त्वाची गोष्ट लपवून ठेवल्याबद्दल दत्तक पालकांचा राग येऊ शकतो. त्या वयात कुठलंही स्पष्टीकरण, सारवासारव, निराकरण यांचा उपयोग होणं कठीण असतं. हे सर्व टाळण्यासाठी पहिली गोष्ट ही की, वस्तुस्थितीची जाणीव नम्रताला होणं आवश्यक आहे. तीही लवकरात लवकर- आणि मुख्य म्हणजे ती जाणीव तिच्या सगळ्यात जवळच्या. प्रेमाच्या व्यक्तींनी करून देणं महत्त्वाचं आहे- अर्थातच हे काम तुमचं आहे. हे पहिल्या प्रथम तुम्हाला स्वीकारावं लागेल'.

''तुम्ही म्हणता त्यात तथ्य दिसतंय डॉक्टर, पण मग हे सांगताना आमच्या मनात इतकी धास्ती असायचं काय कारण?'' 'आपण दत्तक पालक आहोत यातल्या दत्तक या शब्दाबद्दल तुमच्या मनात काही अप्रियता घर करून राहिली आहे. मूल दत्तक घेण्याचा निर्णय हा एका प्रक्रियेतून तुम्ही घेतलेला आहे. त्या प्रक्रियेमध्ये असणारी वैचारिक, भावनिक उलथापालथ, त्यात असणारे मतभेद, संघर्ष; त्यासाठी करावी लागणारी तडजोड ही पार्श्वभूमी तुमच्या मनातून पुसली जाणं कठीण आहे. या पार्श्वभूमीच्या संदर्भात आपण दत्तक पालक आहोत ही जाणीव टोचणीसारखी वाटू शकते. या टोचणीलाच मुळांत छेद देणं आवश्यक आहे. एका वैचारिक प्रक्रियेअंती तुम्ही मूल दत्तक घेण्यात निर्णय ठामपणे घेतलात. त्या निर्णयातला ठामपणा, खंबीरपणा. त्यात तुम्हाला असलेला निवडीचा अधिकार या तुमच्या दृष्टीने जमेच्या बाजू आहेत. त्यातूनच या प्रक्रियेकडे बघण्याचा एक होकारात्मक-पॉझिटिव्ह दृष्टिकोन आपोआप तयार होत जाईल. तसा विचार तुम्ही करणं आवश्यक आहे. ही गोष्ट आम्हाला जमेल असा विश्वास कुठेतरी वाटतोय. तुम्ही म्हणता तसा हे अनुभवातून होईलही. ही गोष्ट तिला लवकरात लवकर म्हणजे कधी सांगावी?''

याबाबतीत निश्चित नियम नाही. पण साधारणपणे तीन ते सहा वर्ष या वयोगटात हे सांगायला सुरूवात करावी. मी सुरूवात करावी असं म्हटलं. 'आम्ही तुझे दत्तक पालक आहोत. ही गोष्ट एकदाची सांगून आपण मोकळे होऊ असं जर तुम्हाला वाटत असेल तर ते बरोबर नाही. नम्रताचं वय जसंजसं वाढत जाईल, तसतशा तिच्या जाणिवा बदलत जातील. वयाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर तुम्ही तिच्याशी याबद्दल संवाद साधणं महत्त्वाचं आहे. संवादाची पातळी अर्थातच वयाबरोबर बदलत जाईल. यातली महत्त्वाची गोष्ट- नम्रताला हे तुम्ही सांगणार नाही आहात. तुम्हाला असलेल्या माहितीत तुम्ही तिला सामील करून घेणार आहात. सहभागी करून घेणार आहात'.

''तुम्ही म्हणता, की हे होकारात्मक पद्धतीने सांगायचं- म्हणजे कसं सांगायचं आणि कुठल्या शब्दात सांगायचं?''

''यात तुम्ही काय सांगता यापेक्षा ते कसं सांगता याला जास्त महत्त्व आहे. शब्दांपेक्षाही त्यातून व्यक्त होणाऱ्या भावनेला जास्त महत्त्व आहे. तुम्ही याबद्दल तिच्याशी बोलत असताना घाबरलेले दिसलात किंवा तुमच्या नजरेत चोरटेपणा दिसला, तर तुम्ही कितीही चांगल्या शब्दात तिला सांगितलंत तरी तिचं समाधान होणार नाही. म्हणूनच तुम्ही तिच्याशी याबाबतीत बोलताना निर्भयपणे आणि तिच्या नजरेला नजर देऊन तिच्याशी बोलायला हवं. या गोष्टी बोलताना तुम्ही आपल्या परिचयात असलेल्या इतर दत्तक मुलांची उदाहरणे देऊ शकता. आपल्या गोष्टींमधले कर्ण, कृष्ण यांचे संदर्भ देऊ शकता. चित्ररूप गोष्टींचा किंवा तुमच्या जुन्या फोटोच्या आल्बमचा उपयोग करू शकता. सर्वांत महत्त्वाचे-जन्मदात्त्या आई-वडिलांचा उल्लेख खरे आई-वडिल असा चुकूनही करायचा नाही. यात खरंखोटं काय असतं? तिला जन्म देणारी आई वेगळी होती पण तुम्हीच म्हणालात तसं तिच्या दृष्टीने तिचे आई-वडील आणि हो, आई-वडील तुम्हीच आहात.''

''तिने समजा विचारलं, मला जन्म देणारी आई कोण?, तर आम्ही काय सांगायचं?''

'त्यावेळी तुम्ही स्पष्टपणे, प्रांजळपणे हे तिला सांगायला हवं की, याबाबतीत आम्हाला काहीही माहिती नाही. तुम्ही अशा तऱ्हेचं एखादं स्पष्टीकरण तिला देऊ शकता. काही वेळा काही कारणांमुळे पालकांना आपल्या मुलांचा सांभाळ करणं शक्य नसतं, असे पालक आपलं मूल दत्तक द्यायला तयार होतात. याला जोडूनच तुम्ही तिला ज्या संस्थेतून दत्तक घेतलंत, त्या संस्थेबद्दल माहिती सांगू शकता. तिथे आम्ही तुला बघितलं आणि तू आम्हाला इतकी आवडलीस की, आम्ही तुझे आई-वडील व्हायचं ठरवलं. अशा तऱ्हेच्या स्पष्टीकरणातून तुम्ही तिला या गोष्टीची ओळख करून देऊ शकता. तुमच्या बोलण्यातला समंजसपणा, विश्वास, आपुलकी, प्रेम हे तिला ठळकपणे दिसल्यावर तुम्ही खात्री बाळगा. ती कुठलाही गैरसमज करून घेणार नाही. हळूहळू याबाबतीत ती तुम्हाला प्रश्न विचारेल. तिच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरं मिळणं

आवश्यक आहे. यासाठी या सर्वच प्रक्रियेकडे अतिशय मोकळ्या मनाने तुम्ही बघणं आवश्यक आहे. कुठल्याही गोष्टीची स्वीकृती अशीच हळूहळू टप्प्याटप्प्याने होत असते.

असं म्हणतात की सत्य बोलावं, पण अप्रिय सत्य बोलू नये. नम्रताच्या आई-वडिलांच्या दृष्टीने हे अप्रिय सत्य होतं, पण त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवायला हवी. आपल्या प्रिय व्यक्तीला विश्वासात घेऊन प्रिय पद्धतीने सांगितलेलं सत्य हे केवळ निरपेक्ष सत्य असतं. त्यात प्रिय-अप्रिय असं काहीच नसतं.

**आपलं महानगर, २० जानेवारी १९९८**

**काही बोलायाचे आहे**